यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
ज्ञानगंगोत्री, गंगापूर धरणाजवळ, गोवर्धन
नाशिक - ४२२ २२२ (महाराष्ट्र) भारत
ज्ञानगंगा घरोघरी
Yashwantrao Chavan Maharashtra
Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Dnyangangotri, Near Gangapur Dam, Govardhan
Nashik - 422 222 (Maharashtra) India
संकेतस्थळ Website : www.ycmou.ac.in https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : coe@ycmou.digitaluniversity.ac दूरध्वनी Telephone : (0253) 2231479
परीक्षा विभाग / Examination Division

जा.क्र. पनिका / मे 2024 /1447 दिनांक : 22/04/2024

**गोपनिय**

# भरारी पथकासाठी सुचनापत्र

विद्यापीठाच्या मे 2024 उन्हाळी परीक्षा दि. 24 मे 2024 पासून सुरू असून विविध विभागीय केंद्रांतर्गत भरारी पथके कार्यरत आहेत, त्याचे कामाचे सुसुत्रिकरणासाठी भरारी पथकांनी अन्य सुचनांसमवेत पुढील निर्देशांचे पालन करावे, याबाबत विभागीय संचालकांनी आपल्या अधिनस्त सर्व भरारी पथकांना निर्देशीत करावे.

1. भरारी पथकांनी परीक्षा केंद्रावर भेट देतांना कॉपी केसेस पाहणे समवेतच त्या केंद्रावर जिथे प्रश्नपत्रिका download होतात त्या Control Room ला भेट देऊन, जागेची गोपनियता, प्रिंट करतांना व प्रिंट काढून झाल्यावर सिलबंद प्रश्नपत्रिका ठेवण्याची दक्षता याबाबत पडताळणी करावी.
2. प्रश्नपत्रिका मल्टीकॉपींग करण्याचे ठिकाण, मल्टीकॉपींग नंतर Block निहाय सिलबंद पाकिटे कपाटात सुरक्षित ठेवली जातात आणि कपाट पुन्हा सिलबंद करून परीक्षा सुरू होण्याच्या 15 मिनीटे आधी उचडून Block Supervisor ला सुपूर्त करणे, ही कामे CCTV च्या निगराणीत होतात का ? एक, दोन दिवसाचे फुटेज तपासावे व खात्री करावी, वरील प्रक्रीयेत त्रुटी असल्यास, फुटेज प्राप्त न झाल्यास त्वरीत विभागीय संचालकांना माहिती कळवावी. CCTV फुटेज जतन करण्यासंदर्भात परीक्षा केंद्रास अवगत करावे.
3. परीक्षा केंद्रावर नियुक्त केलेला स्टाफ हा विद्यापीठाने निश्चित केलेल्या कर्तव्य व जबाबदारीनुसार कामकाज करीत आहे कि नाही याची खात्री करावी.
4. संवेदनशील परीक्षा केंद्रावर वारंवार भेटी द्याव्यात. त्या केंद्रावर Seating flying squad नियुक्त करावयाची आवश्यकता आहे का? याची खात्री करावी. परीक्षा केंद्रांवर आवश्यक सुविधा विद्यापीठाने निश्चित केल्या Check list प्रमाणे आहे कि नाही ते तपासावे.

5. परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांना  प्रवेश देताना study material जवळ बाळगू नये अशा सूचना दिलेल्या आहे, त्याची अंमलबजावणी होत आहे कि नाही ते तपासावे.
6. केवळ विद्यार्थ्यांकडे कॉपी मटेरीयल आहे किंवा कसे एवढ्याच तपासणीपुरत भरारी पथकाचे उद्दीष्ट नाही, भरारी पथकाने केंद्रावर उपलब्ध विद्यार्थ्यांना सुविधा, गैरसोयी, वरील 1, 2 याबाबत प्रक्रीया व अन्य बाबीची माहितीही आपल्या अहवालात नमूद करावी.
7. असेही निर्दशनास येत आहे की, काही भरारी पथके परीक्षा केंद्रावर जाऊन पेपर सुरू होत असताना व तपासणी प्रक्रीया व Block Supervisor च्या स्वाक्षरी झालेली नाही, स्टिकर चिकटवले नाही तरी Block मध्ये Mobile, टेबलवर आढळणे, पुस्तक आढळणे (विद्यार्थ्याकडे नाही) तरी उत्तरपुस्तिका प्रत्यक्ष पाहून कॉपी केली असावी किंवा कसे याचे निरीक्षण न करता फक्त उत्तरपुस्तिकेवर Copy case लिहीतात, संबंधित विद्यार्थ्याला नोटीस देत नाहीत, त्याचे म्हणणे व केंद्रावरी पर्यवेक्षकाचे म्हणणे ऐकुन न घेता केवळ अधिक कॉपी केसेस संख्या करण्यासाठी कॉपी केस नोंदवतात त्यामुळे कॉपी केस समिती, प्रमाद समितीचे काम वाढते व विद्यापीठाच्या भरारी पथकाबाबत संभ्रम निर्माण होतात, सर्व भरारी पथकांनी योग्य तपासणी, पडताळणी, निरीक्षण व खात्रीनंतरच कॉपी केसेस नोंदवणे योग्य असेल तसे सर्व संबंधित भरारी पथकांना अवगत करावे.
8. भरारीपथकाने आपला अहवाल त्वरित विभागीय केंद्रावर जमा करावेत.

विद्यापीठाच्या परीक्षा गैरप्रकार विरहीत, सुरळीत पार पाडण्यासाठी उपरोक्त सुचनांचे पालन करणेबाबत भरारी पथकांना अवगत करावे आणि कार्यवाही करताना कुठलाही नियमभंग होणार नाही याची दक्षता घेणेबाबत सूचित करावे.

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
ज्ञानगंगा घरोघरी
नाशिक

**(भटूप्रसाद पाटील)**
**परीक्षा नियंत्रक**

**प्रति,**

1) **सर्व विभागीय संचालक**

2) **परीक्षा विभाग युनिट** 1,2,3